हल्ला प्रकरणी दोघांना अटक

नाशिक : आईकडे तक्रार केल्याच्या रागातून दोघांवर प्राणघातक हल्ला प्रकरणी पोलिसांनी दोन भावंडांना बेड्या ठोकल्या. शहर गुन्हे शाखेच्या पथकाने जेलरोड परिसरातील लोखंडेमळा भागात ही कारवाई केली. कार्तिक कंडारे आणि टक्की कंडारे (१९) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. देवळाली कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटनेत हातोडीने डोक्यात मारण्यात आल्याने दोघे जखमी झाले होते. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या घटनेनंतर कंडारे बंधू पसार झाले होते.

एकांकिका स्पर्धा

नाशिक : येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेतर्फे अभिनय आणि नाट्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'स्मितोत्सव' एकांकिका स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व नाट्यप्रेमी, हौशी कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील इच्छुकांसाठी ही स्पर्धा खुली असून, मराठी भाषेतील एकांकिकांना या स्पर्धेत सहभाग नोंदविता येणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ९५४५१४५१६३.

पालखी मार्गावरील खड्ड्यांमुळे नाराजी

संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पालखी सोहळा पूर्वनियोजन बैठक

लोकसत्ता प्रतिनिधी

त्र्यंबकेश्वर मार्गावर रस्ता दुरुस्तीमुळे ठिकठिकाणी अशी अवस्था झाली आहे.

२९ जूनला पंढरपूरसाठी पालखी प्रस्थान

- त्र्यंबकेश्वर येथून २९ जून रोजी श्री संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पायी पालखी सोहळ्याचे पंढरपूरसाठी प्रस्थान होणार आहे.
- यासंदर्भात आयोजित पूर्वनियोजन बैठकीत विविध विषयांचा आढावा घेतला.
- यामध्ये पालखी सोहळ्याशी संबंधित आरोग्य, पाणीपुरवठा, पोलीस प्रशासन, रस्ते दुरुस्ती, इंधन, सीएनजी पुरवठा, विद्युत, राज्य परिवहन, महसूल, नगर पालिका अशा विषयांवर चर्चा करण्यात आली.

नाशिक : त्र्यंबकेश्वर.येथील श्री संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पायी पालखी मार्गावर खोदण्यात आलेल्या खड्ड्यांमुळे संस्थानच्या प्रतिनिधींनी नाराजी व्यक्त केली आहे. त्र्यंबकेश्वरपासून पालखी सोहळा निघाल्यावर नाशिकपर्यंत दोन मुक्काम होतात. परंतु, खोदून ठेवलेल्या रस्त्यांमुळे वारकऱ्यांच्या निवासाची सोय होईल की नाही, हा प्रश्न पालखी सोहळ्याच्या आयोजकांपुढे पडला आहे. ही कामे लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

श्री संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पायी पालखी सोहळ्यानिमित्त पूर्वनियोजन आढावा बैठक त्र्यंबकेश्वरचे तहसीलदार गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाने तसेच संस्थानचे अध्यक्ष राहुल महाराज साळुंके आणि नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद जाधव यांच्या उपस्थितीत झाली. बैठकीत वारी मार्गावर खोदण्यात आलेले खड्डे या विषयावर अधिक चर्चा झाली. त्र्यंबकेश्वरमधून २९ जून रोजी श्री संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार आहे.

पालखी सोहळ्याशी संबंधित आरोग्य, पाणीपुरवठा, पोलीस प्रशासन, रस्ते दुरुस्ती, इंधन, सीएनजी पुरवठा, विद्युत, राज्य परिवहन महामंडळ, महसूल, नगर पालिका अशा सर्व विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती या बैठकीस होती.

आषाढी वारी पायी पालखी सोहळ्याच्या पूर्वनियोजनाच्या संपूर्ण तयारीची माहिती तसेच वारकऱ्यांना लागणाऱ्या सोयी सुविधा, व्यवस्था यासंबंधित आवश्यक बाबी संत निवृत्तीनाथ महाराज समाधी संस्थानच्या वतीने संस्थानचे अध्यक्ष राहुल महाराज साळुंके यांनी मांडल्या. नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद जाधव यांनी सकारात्मकता दाखवून वारी संबंधाने जोरदार तयारी करून वारकऱ्यांसाठी सोयी सुविधा आणि इतर व्यवस्था अत्यंत उत्तम दर्जाच्या देण्यात येतील, असे आश्वासित केले. रस्त्यांची अनेक ठिकाणी कामे चालू आहेत. त्याचप्रमाणे पाणी, गॅस आणि इतर इंधन पुरवठा या संबंधाने प्रशासनाने वारकऱ्यांना सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली.

आषाढी वारी पायी पालखी सोहळ्यात साधारणतः ५५ ते ६० दिंड्या सहभागी होणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला. एक ते दीड लाख भाविकांची उपस्थिती या सोहळ्यास राहण्याची शक्यता आहे.

आषाढी वारी पायी पालखी सोहळ्यासाठी कुठल्याही प्रकारची कमतरता उणीव भासता कामा नये. त्याचप्रमाणे वारीची संपूर्ण तयारी लवकरात लवकर करण्यात यावी, अशा सूचना करण्यात आल्या. पालखी सोहळ्याची वेगवेगळ्या माध्यमातून तयारी सुरू असून फिरते शौचालय, पोलीस बंदोबस्त, पाण्याचे टँकर, स्नानगृह, रुग्णवाहिका, वैद्यकीय पथक, इत्यादी मूलभूत सुविधा पुढील काही दिवसात मिळणार आहेत.

भाविकांची वाहने फोडून चोरी करणारा अटकेत

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या वाहनाच्या काचा फोडून चोरी करणाऱ्यास आडगाव पोलिसांनी ताब्यात घेतले. तपोवन भागात या चोरट्याने धुमाकूळ घातला होता. भ्रमणध्वनी विक्री करताना तो पोलिसांच्या गळाला लागला. त्याच्या ताब्यातून एक लाख रुपयांचे आठ भ्रमणध्वनी जप्त करण्यात आले.

कार्तिक नाडार असे चोरट्याचे नाव आहे. पंचवटीतील तपोवन भागात काही महिन्यांपासून चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाहने फोडून माल लंपास केला जातो. ११ एप्रिल रोजी सायंकाळी चोरट्यांनी स्वामी नारायण मंदिर परिसरात उभ्या असलेल्या मोटारीची काच फोडून मोबाइल व पैसे असलेली पर्स चोरण्यात आली होती. याप्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस चोरट्यांचा माग काढत असतांना गुन्हे शोध पथकाचे अंमलदार दीपक भुजबळ यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयित पोलिसांच्या जाळ्यात अडकला. पाठीवर बॅग असलेला तरूण तपोवनात चोरीचे भ्रमणध्वनी विकण्यासाठी येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार सायंकाळी सापळा लावण्यात आला. स्वामी नारायण मंदिराकडून अमरधामकडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयिताच्या मुसक्या आवळण्यात आल्या. संशयिताच्या अंगझडतीत महागडे एक लाख ५ हजार रुपयांचे मोबाइल मिळून आले. गुन्ह्यांची कबुली देत त्याने अनेक वाहने फोडल्याचे सांगितले.

ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक संजय पिसे व शिवाजी आहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक निखील बोंडे उपनिरीक्षक विकास पंचमुख, हवालदार मनोज परदेशी, दादासाहेब वाघ, इमरान शेख, संजय राजुळे, निलेश काटकर, शिवाजी आव्हाड अंमलदार अक्षय गोसावी, सुरेश खालकर, दीपक भुजबळ, प्रितम बोराटे, कुणाल राऊत रवींद्र लिलके, सुमित शिंदे, शक्ती पेंढारकर, मनोज मोरे व वैशाली बच्छाव आदींच्या पथकाने केली.

महिला तलाठी लाच स्वीकारताना जाळ्यात

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : सात बारा उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करणे आणि वारस नोंदीत कागदपत्रानुसार दुरुस्ती करणे, यासाठी १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना बागलाण तालुक्यातील महिला ग्राम महसूल अधिकारीस (तलाठी) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले.

मनिषा बावीस्कर (३६, रा. साठफुटी रोड, पाठक मैदान, सटाणा) असे या संशयित तलाठीचे नाव आहे. बागलाण तालुक्यातील ब्राम्हणगाव येथे त्या कार्यरत आहेत. मूळ तक्रारदाराची ब्राम्हणगाव येथे जमीन आहे. जमीनीच्या कामांसाठी तलाठी बावीस्कर यांनी स्वतःसह मंडळ अधिकारी यांच्यासाठी १० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक कार्यालयात करण्यात आली होती. जनगणना प्रशिक्षणादरम्यान बावीस्कर यांनी उपरोक्त कामांसाठी १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. सटाणा तहसीलदार कार्यालयात पंचांसमक्ष तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पथकाने ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) बावीस्कर यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दरम्यान, शासकीय कार्यालयात कोणत्याही कामासाठी कोणी लाचेची मागणी करीत असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी १०६४ या टोल फ्री ९९३०९९७७००,९५४५०३१०६४ येथे संपर्क साधावा.

सुरगाण्याच जलथॉन उपक्रम

नाशिक : सुरगाणा तालुक्यातील चिंचपाडा जलथॉन-२०२६ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा उद्घाटन प्रा. प्रवीण चौधरी (व्हीजेटीआय, मुंबई) यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन आणि निसर्गसंरक्षण या त्रिसूत्रीवर आधारित या उपक्रमाच्या माध्यमातून ११ गावांच्या सर्वांगीण जलव्यवस्थापन आराखड्याला दिशा देण्यात आली. पक्रमाचे आयोजन जलपरिषद मित्र परिवार, वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट, ऋणमुक्त सेवाभावी फाउंडेशन नाशिक आणि आयडियाझम सामाजिक संस्था नाशिक यांच्या सहकार्याने करण्यात आले. प्रा. चौधरी यांच्या हस्ते ११ गावांच्या जलमित्र स्वयंसेवकांसाठी तयार करण्यात आलेल्या जलस्त्रोत नकाशांचे वाटप करण्यात आले.

निडो होम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)

नोंदणीकृत कार्यालय येथे स्थित: टॉवर ३, ५वा मजला, विंग "बी", कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई- ४०००७०. प्रादेशिक कार्यालय: ऑफिस नं. ४०७-४१०, चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भाम्बुर्डे, शिवाजीनगर, पुणे-४११०१६, महाराष्ट्र.

nido

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता) [रुल ८(१)]

ज्याअर्थी "निडो होम फायनान्स लिमिटेड"चे (पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली) प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट [अँक्ट] २००२ (२००२चा ५४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२ च्या [रुल ३] यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रकमेवरील सर्व किंमत, आकार, खर्च इ. सह एकत्रीत संपूर्ण उक्त रकमेच्या प्रदानाच्या तारखेपर्यंत १५.०२.२०२६ रोजीप्रमाणे देणी व देय असलेली **रु.५,९६,४९२.९७/- (रुपये पाच लाख शहाण्णव हजार चारशे ब्याण्णव व पैसे सत्याण्णव फक्त) या सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणको/ सह-ऋणको राजेंद्र एल. शिंदे (ऋणको), कल्पना आर. शिंदे (सह-ऋणको) यांच्यावर फर्माविणारी दिनांकित १६.०२.२०२६ मागणी सूचना** निर्गमित केली आहे.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **आज दिनांक ०९ जून, २०२६ रोजी** सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२ च्या रुल ८ यासह वाचलेल्या अॅक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा विधायक ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार **रु.५,९६,४९२.९७/- (रुपये पाच लाख शहाण्णव हजार चारशे ब्याण्णव व पैसे सत्याण्णव फक्त)** आणि त्यावरील व्याज या रकमेकरिता **निडो होम फायनान्स लिमिटेडच्या (पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)** आकाराच्या विषयाधीन असणार आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनेकरिता अॅक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

मालमत्तेचे वर्णन

मालमत्तेची अनुसूची: पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- मालमत्ता धारण केलेला फ्लॅट नं. ५ मोजमापाचा ४९.२५ चौ.मी. म्हणजेच ५३०.०० चौ.फू. बिल्ट-अप, "साईलिला को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि." म्हणून ज्ञात असलेल्या योजनेतील पहिल्या मजल्यावरील, मोजमापाचे १७५.७५ चौ.मी. व प्लॉट नं. ३११ मोजमापाचे १९०.९४ चौ.मी., गॅट नं. ३०७बी + ३०८ए यापैकी व येथे स्थित- व्हिलेज अंबाड खुर्द, ता. व जि. नाशिक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यादेत, महाराष्ट्र.

दिनांक: ०९.०६.२०२६
स्थळ: नाशिक

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेडकरिता
(पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)

वसुली अधिकाऱ्याचे कार्यालय

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्स्चेंज इमारत, सेक्टर- ३०ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३

परिशिष्ट -१३
फॉर्म क्र. २२
[नियम ३७(१) पहा]
सर्व परवानगीयोग्य पद्धतीने

आरपी क्र. ११०, २०२४

लिलाव विक्रीची तारीख : ०७.०७.२०२६

विक्रीची घोषणा : स्थावर मालमत्ता

कर्ज वसुली आणि दिवाळखोरी कायदा, १९९३ सहवाचता आयकर कायदा, १९६१ च्या दुसऱ्या अनुसूचीच्या नियम ३७, ३८ आणि ५२ (१)(२) अंतर्गत विक्रीचे घोषणापत्र

बँक ऑफ महाराष्ट्र
विरुद्ध
श्री. कांतिलाल तुळशीराम भोये आणि इतर

प्रति,
सीडी १ श्री. कांतिलाल तुळशीराम भोये. सीडी-२. श्री. मोतीराम तुळशीराम भोये.
सीडी-३. श्री. तुळशीराम पांडू गवळी. सीडी-४. श्री. पंडित शंकर महाले.
सर्व येथे आहेत : पोस्ट नळवाडपाडा, ता-दिंडोरी, जिल्हा-नाशिक.

१. ज्याअर्थी, माननीय पीठासीन अधिकारी, **कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)** यांनी **ओ.ए. क्र. ११७, २०१९** यामध्ये, प्रमाणपत्रधारकाकडून (सीडी) व्याज आणि खर्चासह **रु. ३८,६२,५४८.०० (रुपये अडतीस लाख बासष्ट हजार पाचशे अठ्ठेचाळीस फक्त)** सदर या रकमेच्या वसुलीसाठी वसुली प्रमाणपत्र क्र. **आरसी क्र. ११०, २०२४** तयार केले होते आणि तुम्ही, प्रमाणपत्रधारक (सीडी), प्रमाणपत्रधारक बँक/वित्तीय संस्थेची देय रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरलात आणि ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर वसुली प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्यानुसार प्रमाणपत्र ऋणदात्याच्या गहाण ठेवलेल्या/जप्त केलेल्या मालमत्तांच्या विक्रीचा आदेश दिला आहे.
२. सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, स्थगितीचा कोणताही आदेश नसल्यास, सदर मालमत्ता **दिनांक ०७.०७.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वा. ते ०२.०० वा. दरम्यान** या वेळेत लिलावाद्वारे विकली जाईल आणि बोली **वेबसाइट** support@bankeauctions.com याद्वारे ऑनलाइन लावली जाईल. लिलाव सेवा पुरवठादाराच्या अधिकृत संपर्क व्यक्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे, **नाव: सी१ इंडिया प्रा. लि. श्री. भाविक पंड्या, मोबाइल क्र.- ८८६६६८२९३७, ईमेल-** maharashtra@c1india.com. **हेल्पलाइन क्रमांक: ९१-१२४-४३०२०२०/२१/२२/२३/२४, ईमेल -** support@bankeauctions.com.
३. लिलाव सेवा पुरवठादारासाठी अधिकृत बँक अधिकाऱ्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे, नाव: सुश्री सानिया खोब्रागडे, मोबाइल नं. ९०४९३७६४४३ ईमेल: bom2259@mahabank.co.in.
४. सदर ही विक्री, खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्यानुसार, वर नाव दिलेल्या प्रतिवादी/सीडीच्या मालमत्तेची असेल आणि सदर मालमत्तेशी संबंधित देयता व दावे, जेवढे निश्चित झाले आहेत, ते अनुसूचीमध्ये प्रत्येक लॉटसमोर नमूद केलेले आहेत.
५. मालमत्ता 'जसे आहे तसे आहे' आणि 'जे आहे त्या स्थितीत' विकली जात आहे.
६. मालमत्ता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या लॉटमध्ये विक्रीसाठी ठेवली जाईल, मालमत्तेच्या काही भागाच्या विक्रीतून वसूल करावयाची रक्कम पूर्ण झाल्यास, उर्वरित भागाच्या बाबतीत विक्री तात्काळ थांबवली जाईल. जर कोणताही लॉट विकण्यापूर्वी, वरील निर्देशित प्रमाणपत्रात नमूद केलेली थकबाकी + व्याज खर्च (विक्री खर्चासह) विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याकडे सुपूर्द केली गेली किंवा त्याच्या समाधानार्थ पुरावा दिला गेला की, अशा प्रमाणपत्राची रक्कम, व्याज आणि खर्च निम्नस्वाक्षरीकार यांना अदा करण्यात आला आहे, तर विक्री थांबवली जाईल.
७. विक्रीच्या ठिकाणी, सर्वसामान्य जनतेला स्वतः किंवा रितसर अधिकृत प्रतिनिधीमार्फत बोली लावण्यासाठी आमंत्रित केले जाते. सदर या विक्रीच्या संबंधात कोणतेही कर्तव्य पार पाडणारा कोणताही अधिकारी किंवा इतर व्यक्ती, तथापि, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, विक्री होणाऱ्या मालमत्तांमधील कोणत्याही हितासाठी बोली लावणार नाही, ते संपादन करणार नाही किंवा संपादन करण्याचा प्रयत्न करणार नाही.
८. सदर ही विक्री, आयकर कायदा, १९६१ च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांमध्ये विहित केलेल्या अटींच्या, तसेच पुढील अतिरिक्त अटींच्या विषयाधीन असेल :-
९. सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेला तपशील, निम्नस्वाक्षरीकार यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार दिला आहे, परंतु सदर या घोषणेतील कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळण्याबद्दल निम्नस्वाक्षरीकार जबाबदार राहणार नाही.
१०. ज्या आरक्षित किमतीपेक्षा कमी किमतीत मालमत्ता विकली जाणार नाही, ती अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.
११. लिलावात वाढ करावयाची रक्कम. बोलीच्या रकमेबाबत किंवा बोली लावणाऱ्या व्यक्तीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास, ती वस्तू तात्काळ पुन्हा लिलावासाठी ठेवली जाईल किंवा रद्द केली जाऊ शकते.
१२. सर्वाधिक बोली लावणाऱ्याला कोणत्याही लॉटचा खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, मात्र अट अशी आहे की, तो/ती/ते बोली लावण्यासाठी कायदेशीररित्या पात्र असावा/असावी आणि पुढे अट अशी की, त्याने/तिने/त्यांनी लावलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसावी. जेव्हा देऊ केलेली किंमत इतकी स्पष्टपणे अपुरी वाटेल की, सर्वोच्च बोली स्वीकारणे अयोग्य ठरेल, तेव्हा ती स्वीकारण्यास नकार देणे हे निम्नस्वाक्षरीकार यांच्या विवेकबुद्धीवर अवलंबून असेल.
१३. प्रत्येक इच्छुक बोलीदाराला इसारा ठेव अनामत रक्कम - ईएमडी खालील मार्गांनी भरणे आवश्यक आहे: डिमांड ड्राफ्ट (डीडी)/पे ऑर्डरद्वारे **'द रिकव्हरी ऑफिसर, डेट्स रिकव्हरी ट्रिब्युनल (डीआरटी-III), मुंबई' यांच्या नावे आर.ओ. डेट्स रिकव्हरी ट्रिब्युनल मुंबई (डीआरटी-III) यांच्याकडे जमा करणे किंवा ऑनलाइन पद्धतीने आरटीजीएस/एनईएफटी याद्वारे/थेट खाते क्र. ०६२७११०१००००१९५** यामध्ये जमा करणे, युनियन बँक ऑफ इंडियाचे नाव, जिचा आयएफएससी कोड यूबीआयएन०८०६२७७ आहे आणि मालमत्तेच्या बोली अर्जाच्या तपशिलासोबत पॅन कार्ड, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, ई-मेल आयडी आणि मोबाइल नंबरची प्रत अपलोड करा आणि कंपनीच्या किंवा इतर कोणत्याही कागदपत्राच्या बाबतीत, कंपनीचे प्रतिनिधी/वकील आणि अशा ठेवीची पावती/काउंटरफॉइल याची पुष्टी करणे.
१४. सदर डीडी/पे ऑर्डर किंवा आरटीजीएस/एनईएफटी याद्वारे केलेल्या पेमेंटचा मूळ पुरावा, त्यासोबत रितसर भरलेला लिलाव बोली अर्ज, ओळखीची स्व-साक्षांकित प्रत (मतदार ओळखपत्र/वाहनचालक परवाना/पासपोर्ट) ज्यावर भविष्यातील संपर्कासाठी पत्ता नमूद असावा, पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत आणि एक रद्द केलेला चेक, हे सर्व **वसुली अधिकारी, डीआरटी-III यांच्या कार्यालयात दिनांक ०३.०७.२०२६ रोजी सायंकाळी ४.३० वा.** पूर्वी पोहोचणे आवश्यक आहे, त्यानंतर प्राप्त झालेली ईएमडी किंवा ईएमडीचा मूळ पुरावा विचारात घेतला जाणार नाही.
१५. इच्छुक बोलीदारांना असा सल्ला दिला जातो की, त्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी आणि मालमत्तेवरील मालकी हक्क आणि त्यावरील काही बोजा असल्यास, त्याबद्दल स्वतःची खात्री करून घ्यावी.

इसारा ठेव अनामत रक्कम (ईएमडी), आरक्षित किंमत आणि बोली वाढ खालीलप्रमाणे निश्चित करण्यात याव्यात :

अ. क्र.	मालमत्तेचा तपशील	ईएमडी रक्कम (रुपयात)	आरक्षित किंमत (रुपयात)	बोली वाढ (रुपयांमध्ये) च्या पटीत
१	गट क्र. १४०, क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ०१.०१ मध्ये, गाव नळवाडपाडा, ता-दिंडोरी, जि नाशिक.	२,०४,५३०/-	२०,४५,३००/-	२०,०००/-
२	गट क्र. १४१, क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ०.९९ मध्ये, गाव नळवाडपाडा, ता-दिंडोरी, जि-नाशिक.	२,००,४८०/-	२०,०४,८००/-	२०,०००/-
३	गट क्र. १६२, क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ०१.९७ मध्ये. गाव नळवाडपाडा, ता.दिंडोरी, जिल्हा नाशिक	३,९३,०४०/-	३९,३०,४००/-	२०,०००/-

१६. नियत तारीख आणि वेळेनंतर प्राप्त झालेली ईएमडी नाकारली जाईल, आणि ई-लिलाव फॉर्ममध्ये त्यांनी दिलेल्या पर्यायानुसार ईएमडीपोटी भरलेली रक्कम त्यांना परत केली जाईल. लिलावात सहभागी होण्यासाठी बोली लावणाऱ्याकडे एक सक्रीय ईमेल आयडी आणि इंटरनेट कनेक्शन असलेले संगणक टर्मिनल/प्रणाली असणे ही त्याची/तिची संपूर्ण जबाबदारी आहे. ऑनलाइन बोली प्रक्रियेदरम्यान कनेक्टिव्हिटीबाबत कोणतीही समस्या उद्भवल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी बोली लावणाऱ्याची असेल आणि या संदर्भात कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.
१७. लिलावाच्या दिलेल्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत बोली वाढवल्यास, इतर बोली लावणाऱ्यांना त्यांच्या बोली वाढवता याव्यात, यासाठी लिलावाची वेळ आणखी **५ मिनिटांनी** वाढवली जाते आणि वाढवलेल्या ५ मिनिटांच्या वेळेत आणखी कोणतीही वाढ न झाल्यास लिलाव प्रक्रिया समाप्त होते. जंगम/स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, प्रत्येक लॉटची किंमत विक्रीच्या वेळी किंवा विक्री आयोजित करणाऱ्या अधिकाऱ्याने निर्देश दिल्याप्रमाणे शक्य तितक्या लवकर अदा केली जाईल आणि पैसे भरण्यात कसूर झाल्यास, ती मालमत्ता पुनर्विक्रीसाठी तात्काळ पुन्हा लिलावात ठेवली जाईल.
१८. यशस्वी बोली लावणाऱ्याला, लिलाव पूर्ण झाल्यावर ईएमडी रक्कम समायोजित केल्यानंतर, विक्री रकमेच्या २५% रक्कम, वर नमूद केलेल्या तपशिलानुसार दुसऱ्या दिवशीपर्यंत वरील निर्देशित खात्यात/डिमांड ड्राफ्ट/बँकर चेक/पे ऑर्डरमध्ये जमा करावी लागेल. जर दुसरा दिवस सुट्टीचा किंवा रविवार असेल, तर पुढील पहिल्या कार्यालयीन दिवशी होईल.
१९. खरेदीदाराने विक्री रकमेच्या उर्वरित ७५% रक्कम मालमत्तेच्या विक्रीच्या तारखेपासून १५ व्या दिवसापर्यंत (तो दिवस वगळून) जमा करावी किंवा जर १५ वा दिवस रविवार किंवा इतर सुट्टीचा दिवस असेल, तर १५ व्या दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी, वर नमूद केलेल्या विहित पद्धतीने जमा करावी. वरील व्यतिरिक्त, खरेदीदाराने पाऊंडेज शुल्कदेखील **वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३) यांच्याकडे रु. १,०००/- पर्यंत @२% दराने आणि रु. १,०००/- च्या वरील निर्देशित रकमेवरील अतिरिक्त रकमेवर @१% दराने, रजिस्ट्रार, कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३) यांच्या नावे डीडी याद्वारे जमा करावे.**
२०. विहित मुदतीत पैसे भरण्यात कसूर झाल्यास, विक्रीचा खर्च वजा जाता, अधोस्वाक्षरीकर्त्यास योग्य वाटल्यास, ठेव शासनाकडे जप्त केली जाईल आणि पैसे भरण्यात कसूर करणाऱ्या मालमत्तेचा खरेदीदार, मालमत्तेवरील किंवा नंतर ती विकली जाऊन मिळणाऱ्या रकमेच्या कोणत्याही भागावरील आपले सर्व हक्क गमावेल. विक्रीची नवीन घोषणापत्र जारी केल्यानंतर मालमत्ता पुन्हा विकली जाईल.
२१. मुंबई **कर्ज वसुली न्यायाधिकरण (डीआरटी ३)** च्या वसुली अधिकाऱ्यांकडून विक्रीची पुष्टी होईपर्यंत, सर्वोच्च बोली लावणाऱ्याला मालमत्तेवर कोणताही हक्क किंवा मालकी असणार नाही.
२२. अयशस्वी बोली लावणाऱ्यांनी जमा केलेली ईएमडीची रक्कम, जर ती ऑनलाइन पद्धतीने जमा केली असेल, तर ऑनलाइन पद्धतीने परत केली जाईल. जर ईएमडी डीडी/बीसी/पे ऑर्डरच्या स्वरूपात जमा केली असेल, तर ती रक्कम प्रत्यक्ष परत केली जाईल. ई-लिलाव ईएमडी अर्जासोबत पाठवलेल्या मूळ ओळखपत्राची छायाप्रत सोबत आणणे आवश्यक आहे. ईएमडी रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
२३. ई-लिलाव ईएमडी फॉर्ममध्ये नमूद केलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावाचा विक्री प्रमाणपत्रात समावेश किंवा प्रतिस्थापन करण्याची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.
२४. विक्रीसाठी आणलेल्या मालमत्तेच्या एकापेक्षा जास्त वस्तूंच्या बाबतीत, अशा मालमत्तांची विक्री सोयीनुसार केली जाईल आणि विक्रीच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे क्रमाने जाणे बंधनकारक नाही.
२५. एनआरआय बोली लावणाऱ्यांनी त्यांच्या पासपोर्टच्या फोटो पानाची एक प्रत सोबत जोडणे अनिवार्य आहे आणि त्यांनी आपली बोली भारतीय दूतावासाकडून (एम्बसी) रितसर प्रमाणित करून पाठवावी. जंगम/स्थावर मालमत्ता 'जशी आहे तशी' या तत्त्वावर विकली जात आहे आणि नियमांनुसार प्रसिद्धी शुल्क, महसूल आणि इतर बोजांच्या विषयाधीन आहे. निम्नस्वाक्षरीकार कोणतीही किंवा सर्व बोली अवाजवी आढळल्यास त्या स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवतो किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी लिलाव पुढे ढकलू शकतो.

सदर या विक्री घोषणेचा तपशील वेबसाइट www.drt.gov.in **यावर पाहता येईल.**

मालमत्तेचे परिशिष्ट

लॉट क्र.	विक्री करायच्या मालमत्तेचे वर्णन	मालमत्तेवर किंवा तिच्या भागावर आकारलेला महसूल	मालमत्तेवर असलेल्या कोणत्याही बोज्याचा तपशील	दावे, जर असल्यास, जे मालमत्तेवर मांडण्यात आले आहेत आणि त्याच्या स्वरूपाशी आणि मूल्याशी संबंधित इतर कोणतीही ज्ञात माहिती
१	गट क्र. १४०, क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ०१.०१ मध्ये, गाव नळवाडपाडा, ता-दिंडोरी, जि नाशिक.	माहित नाही	माहित नाही	माहित नाही
२	गट क्र. १४१, क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ०.९९ मध्ये, गाव नळवाडपाडा, ता-दिंडोरी, जि-नाशिक.	माहित नाही	माहित नाही	माहित नाही
३	गट क्र. १६२, क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ०१.९७ मध्ये. गाव नळवाडपाडा, ता.दिंडोरी, जिल्हा नाशिक	माहित नाही	माहित नाही	माहित नाही

टीप : लिलावाच्या तारखेनुसार, म्हणजेच दि. ०७.०७.२०२६ रोजी, सीडीवर (अंदाजे) रु. ३९,०१,९२२.०० इतकी एकूण रक्कम थकीत आहे. वर नमूद केलेल्या मालमत्तांच्या पाहणीची **तारीख ०१.०७.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ४.०० वा.** दरम्यान निश्चित करण्यात आली आहे. बोली स्वीकारण्याची अंतिम तारीख **०३.०७.२०२६ रोजी सायंकाळी ४.३० वा.** पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

सदर दिनांक ०२.०६.२०२६ रोजी शिक्क्यासह आणि माझ्या हाती दिले.

शिक्का

सही/-
(मुकेश चंद मीना) वसुली अधिकारी-१
कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

शिक्षकांच्या प्रश्नांविषयी चर्चा

नाशिक : मुख्याध्यापक संघ, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, टीडीएफ, शिक्षक भारती, इस्तू शिक्षकेतर कर्मचारी संघटना, प्रयोगशाळा व कलाशिक्षक संघ यांची संयुक्त बैठक शहरातील रुंगटा विद्यालयातील सभागृहात झाली. जिल्ह्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पदोन्नती, पर्यवेक्षक मान्यता, थकीत वेतन देयकाबाबत प्रमाणपत्र, न्यायालयीन प्रकरणी चुकीचे माहिती अधिकार, विद्यार्थी पालक यांच्या समस्या, बिंदू नामावली, विद्यार्थी नाव बदल, संस्था पातळीवरील समस्या, शिक्षण अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांची वर्तणूक, वैद्यकीय देयकांना विलंब, सेवानिवृत्ती प्रस्ताव, संच मान्यता दुरुस्ती, पवित्र पोर्टल नोंदणी, कला शिक्षकांचे प्रश्न अनुकंपा, भा कार्ड या सर्व प्रश्नांनाची मांडणी पदाधिकाऱ्यांनी शिक्षण अधिकारी यांच्यासमोर केली.

सूचनांसाठी आवाहन

नाशिक : राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाकरता स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करण्यात येत आहे. या अनुषंगाने महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या वतीने धोरण तयार करण्यासाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात येत आहे. अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेले सविस्तर प्रस्ताव पाठवावेत. यासाठी ८२०८५८९१९५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

UJJIVAN

नोंदणीकृत कार्यालय: ग्रेप गार्डन, क्र. २७, थर्ड "ए" क्रॉस, १८वा मेन, सहावा ब्लॉक, कोरामंगला, बेंगळूरू ५६००९५, कर्नाटक.
क्षेत्रीय कार्यालय: सातवा मजला, अलमोंटे आयटी पार्क, स. क्र. ८, खराडी-मुंढवा बायपास, खराडी गाव, पुणे- ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, २००२ मधील नियम ८(६) व ९ च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.चे प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद १३(४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत पुढील मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. कर्जदार आणि आम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की खाली नमूद खात्यामधील तारण मालमत्तेचा बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद दिनांकास "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" तत्त्वावर जाहीर लिलाव करण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणकाराचे नाव	१३(२) मागणी सूचना/ या दिनांकास थकबाकी रक्कम (रु. मध्ये)	ताबा दिनांक	आरक्षित किंमत रु.मध्ये / बयाणा रक्कम रु.मध्ये
1	4423210080000005/ 4423-NASHIK CENTRAL	१. श्री. हेमंत किसन चौधरी, २. श्री किसन भिका चौधरी, ३. श्रीमती भारतीबाई किसन चौधरी, ४. श्रीमती दीपिका हेमंत चौधरी **सर्वांचा पत्ता:** राहणार, सदनिका क्र. ५, वरदकृपा- ३, मखमलाबाद, तालुका नाशिक, जि. नाशिक, महाराष्ट्र -४२२००१	18.02.2020 / Rs. 10,19,406/- as on 23.12.2019	12.12.2025	Rs.15,05,000/- / Rs.1,50,500/-
अचल मालमत्तेचे वर्णन: सदनिका क्र. ५, बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे ५४.८३ चौ.मी., दुसरा मजला, वरदकृपा को.ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., बिल्डींग क्र. ३, बिगर-शेती प्लॉट क्र. १, क्षेत्रफळ सुमारे ६१८ चौ.मी. आणि प्लॉट क्र. २, क्षेत्रफळ सुमारे ३२० चौ.मी., सर्व्हे क्र. ३६/२/१, मखमलाबाद शिवार, ता. व जि. नाशिक, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत आणि नोंदणी व उप-नोंदणी जिल्हा नाशिक. **चतुःसीमा:** पूर्वेस- सदनिका क्र. ६, पश्चिमेस- सर्व्हे क्र. ३६/२, दक्षिणेस- जिना, उत्तरेस- मोकळी जागा. **ही मालमत्ता आपल्यापैकी क्र. २ व क्र. ३ यांचे मालकीची आहे.**					
2	4423210080000004 / 4423-NASHIK CENTRAL	१. श्री. रोहित अनिल गाडे, २. श्रीमती पुष्पा अनिल गाडे **दोघांचा पत्ता:** राहणार येथेः सदनिका क्र. ०७, लक्ष्मीज्योत सोसा., कॅनल रोड, जेल रोड, अवस्ती मंदिराजवळ, नाशिक रोड, नाशिक- ४२२१०१.	11.10.2021 / Rs. 6,33,788/- as on 29.09.2021	19.07.2025	Rs.7,15,000/- / Rs. 71,500/-
अचल मालमत्तेचे वर्णन: दुकान क्र. २९, क्षेत्रफळ सुमारे १८.५८ चौ.मी., बांधलेल्या इमारतीत, लता कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ०१,०२,०४ वर बांधलेली, क्षेत्रफळ सुमारे ५०७.५०+३११.५०+५४०.०० चौ.मी., गट क्र. ६९७ मधील, मौजे शिवार, ता. आणि जिल्हा नाशिक					

मालमत्तांचा पाहणी दिनांक आणि वेळ	**: १५.०६.२०२६ आणि २३.०६.२०२६ रोजी सका. ११.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत**
बोली व बयाणा रक्कम सादरीकरणाचा दिनांक	**: २५.०६.२०२६, २९.०६.२०२६ रोजी स. ११.०० वाजेपर्यंत**
लिलावाचा दिनांक व वेळ	**: २९.०६.२०२६, दु. ०२.०० ते ५.०० वाजेपर्यंत**
बयाणा रक्कम रु.मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." यांचे नावे डिमांड ड्राफ्टच्या माध्यमातून भरण्यात यावी)	

बोली सादरीकरणाचे व लिलावाचे स्थान: उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., मोगल आर्केड, मोगल हॉस्पिटलच्या मागे, जेल रोड, दत्त मंदिर, नाशिक रोड, नाशिक, महाराष्ट्र - ४२२१०१.
(संपर्क: दीपक मंत्री- ९५६११५७७५७, अक्षय अंधारे- ८६०००६०५००)

अटी व शर्ती: ई-लिलाव "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर घेण्यात येईल.
१. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्याअगोदर बोजे, लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेचा मालकी हक्क, आणि मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे/ अधिकार/ थकबाकी इ. बाबत स्वतः चौकशी करावी. सदर ई-लिलाव जाहिरात बँकेकडून देण्यात येणारे वचन किंवा त्यांचे प्रतिनिधित्व नसून तसे समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची विक्री बँकेस ज्ञात व अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. तिसऱ्या पक्षाने काही दावे/ अधिकार/ थकबाकीची मागणी इ. केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको जबाबदार नसतील.
२. बोली सादर करण्याअगोदर मत्ता आणि विनिर्देशांची पाहणी करून स्वतःची खात्री करून घेण्याची जबाबदारी बोलीदाराची असेल. प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद करण्यात आलेल्या ठिकाणी इच्छुक बोलीदारांना लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेची पाहणी करता येईल.
३. इच्छुक बोलीदारांनी खाली नमूद केल्यानुसार लिलावाच्या दिनांकाच्या एक दिवस अगोदर निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्याकडे बोली सादर कराव्यात.
४. सदर ई-लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार - मे. सी१ इंडिया प्रा. लि., संपर्क व्यक्ती- प्रभाकरन एम. (मो. क्र. ७४१८२८१७०९) यांचेद्वारे राबविण्यात येईल. इच्छुक बोलीदारांनी मालमत्तांच्या तपशीलासाठी **https://www.bankeauctions.com** किंवा **https://www.ujjivansfb.in/e-auctions** येथे भेट द्यावी आणि बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी **https://www.bankeauctions.com** या पोर्टलवर आपले नाव नोंदवावे आणि आपला युजर आयडी व पासवर्ड निःशुल्क प्राप्त करून घ्यावा. संभाव्य बोलीदार सेवा पुरवठादार मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात, हेल्पलाइन क्रमांक- ७२९११९१८८२४, २५, २६, सपोर्ट ई-मेल आयडी: **support@bankeauctions.com**, लिलाव पोर्टल- **https://www.bankeauctions.com.**
५. मालमत्तेची विक्री सर्वोच्च बोलीदार/ प्रस्ताव रकमेस मालमत्तेची विक्री करण्यात येईल, परंतु त्यासाठी सुरक्षित धनको म्हणजे उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. यांनी बोली स्वीकारणे आवश्यक आहे. परंतु, आवश्यक वाटल्यास आपसांत बोली करण्याची परवानगी देण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना असेल. कुठलेही कारण न देता कोणताही प्रस्ताव/ निविदा स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यास असेल.
६. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम विक्री रकमेचा काही भाग म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम परत करण्यात येईल, बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी बोली किंमत स्वीकारल्यानंतर २४ तासांच्या आत तोवर भरलेली बयाणा रक्कम समायोजित करून विक्री किमतीच्या २५% एवढी रक्कम यशस्वी बोलीदारास भरावी लागेल आणि उर्वरित ७५% रकमेचा भरणा विक्रीच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत किंवा अशा वाढीव कालावधीत करावा लागेल आणि कोणत्याही परिस्थितीत हा कालावधी लेखी मंजूर केल्यानुसार ३ महिन्यांहून अधिक नसावा आणि ही परवानगी देण्याचा सर्वस्वी अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यास असेल. यशस्वी बोलीदाराने हा भरणा न केल्यास प्रस्तावदाराने तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मालमत्ता पुन्हा लिलावात काढण्यात येईल आणि अशी कसूर करणाऱ्या खरेदीदारास मालमत्ता/ रकमेच्या संदर्भात कोणताही दावा/ अधिकाराची मागणी करता येणार नाही.
७. सदर प्रकाशन अनपेक्षित घटना कलमाच्या अधीन आहे.
८. बोलीदारांनी स्वतःचे हित लक्षात घेता शेवटच्या क्षणी बोली देणे टाळावे कारण इंटरनेट काम न करणे/ वीजपुरवठा खंडित होणे इ. सारखी बाब झाल्यास उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार नसतील. अशी अप्रिय परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वीजपुरवठा बॅक-अप इ. सारखी आवश्यक ती व्यवस्था/ पर्याय अवलंबावेत जेणेकरून त्यांना अशा परिस्थितीस बगल देत लिलावात यशस्वीपणे सहभागी होता येईल.

तारण मालमत्तांच्या घेण्यात येणार असलेल्या जाहीर लिलावाबाबत वर नमूद कर्जदार/ जामीनदार/ गहाणकार यांना देण्यात येणारी ही सूचनादेखील आहे.

स्थान: महाराष्ट्र
दिनांक: ११.०६.२०२६

स्वा/- प्राधिकृत अधिकारी,
उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक